पुणे महानगरपालिका

अद्धितीय & Unique

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगपालिका
जा.क्र.अतिमआ(ज)/ १६५५
दिनांक - २८/०५/२०२०

## - कार्यालयीन आदेश -

विषय : कोविड -१९ चे अनुषंगाने मा.स्थायी समिती बैठकीमध्ये खातेप्रमुख यांचे उपस्थितीबाबत.

नगरसचिव कार्यालयाकडून प्रत्येक आठवड्याला मा.स्थायी समिती बैठकांचे आयोजन करण्यात येत असते व त्या अनुषंगाने सदर बैठकीमध्ये विविध खात्यांकडील कामांबाबतचे विषय चर्चेला येत असल्याने त्याकरिता पुणे मनपाकडील सर्व खातेप्रमुख हे त्यांचे प्रतिनिधींसमवेत बैठकीस उपस्थित राहतात.

तथापि कोविड -१९ ची शहरातील सद्यस्थिती पाहता, सामाजिक अंतर राखून दैनंदिन कामकाज करणे अनिवार्य असून मे.शासनाने याबाबत वेळोवेळी आदेश देखील पारित केलेले आहेत. या बाबत मा.अध्यक्ष स्थायी समिती आणि मा.महापालिका आयुक्त यांचेशी झालेली चर्चेनुसार खालील आदेश देण्यात येत आहेत

स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सर्व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे योग्य होणार नसल्याने या कार्यालयीन परिपत्रकाचे दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत ज्या ज्या वेळी स्थायी समितीची सभा आयोजित केली असेल त्या सभांना मा. महापालिका आयुक्त,मा.अति.महापालिका आयुक्त (ज)/(वि)/(इ) या चार अधिकारी वर्गापैकी एक तसेच शहर अभियंता, आरोग्य अधिकारी, मुख्य अभियंता(पाणी पुरवठा), मुख्य लेखा व वित्त अधिकारी,सह आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) तसेच कार्यपत्रिकेवरील विषयाशी संबंधित खातेप्रमुख यांनी उपस्थित राहावयाचे आहे.

उपस्थित सर्व अधिकारी वर्ग यांनी सामाजिक अंतर (Social Distancing) राखण्याकरिता दोन अधिकारी यांचे मध्ये एक खुर्ची रिकामी ठेवून आसन व्यवस्था ठेवावी.

उर्वरित सर्व खातेप्रमुख यांनी बैठकीच्या दिवशी व वेळी मनपा मुख्य भवन येथील खात्याचे कार्यालयामध्येच उपस्थित रहावे. आवश्यकता असल्यास त्यांना बैठकीला बोलवण्यात येईल अथवा भ्रमणध्वनीवर माहिती घेण्यात येईल.

Rubal 28/5/2020
(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
पुणे महानगरपालिका

प्रत:-सर्व खातेप्रमुख यांचे माहितीस्तव .....